नियमीत फौजदारी खटला क्र. **१२१/२०२४**
निशाणी क्र. **१७/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०१** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **सुजित सुनिल सुर्वे** |
| वय सुमारे | : | ३९ वर्षे, व्यवसाय : गॅरेज |
| निवासस्थान | : | मु. वरसोली, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. प्रसाद पाटील यांचेमार्फत</u>** :

घटना दि. १०/०४/२०२४ रोजी सकाळी ०८:३० वाजताच्या सुमारास घरी गोंधळपाडा येथे घडली होती. मी फोनवर बोलत होतो. माझ्या पत्नीने विचारले की, कोणाचा फोन आहे. माझ्या पत्नीने तिचे भाऊ रोहीत पवार व सागर पवार यांना बोलावले. त्या दोघांनी रॉडने मला मारहाण केली. रोहीतने डोक्यावर मारण्याचा प्रयत्न केला. मी वार वाचवण्याचा प्रयत्न केला असता तो माझ्या डाव्या हाताच्या कोपऱ्यावर बसला. रोहीतने पाठीवर मारहाण केली. सागरने दुसरा रॉड घेवून दोन्ही पायावर व हातावर मारहाण केली. त्याने हाताने माझ्या डोक्यावर मारले. त्यांनी मला भरपूर मारहाण केली. माझ्या पत्नीने सोडवण्याचा प्रयत्न केला

०२. त्यानंतर मी माझ्या आई, बहीणीला व मामाला बोलावले. त्यानंतर मी, आई व बहीण पोलीस ठाण्यात गेलो. पोलीसांनी आम्हाला अलिबाग येथील सिव्हील हॉस्पीटलमध्ये पाठविले. तेथे मला उपचार करण्यात आले. मी सिव्हील हॉस्पीटलमध्ये सायं. ६:०० ते ६:३० वाजता जबाब दिला. माझ्यावर उपचार चालू असल्याने मला जबाब देण्यास उशीर झाला. मला माझा जबाब दाखवल्यास मी ओळखू शकेन. आता मला दाखवण्यात आलेली फिर्याद तिच आहे. त्यातील

मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र. पी–१** म्हणजेच **निशाणी क्र. १८** देण्यात येते. आता मला दाखवण्यात आलेली छापील फिर्याद तिच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र. पी–२** म्हणजेच **निशाणी क्र. १९** देण्यात येते. मला ज्या लोखंडी रॉडने मारहाण झाली होती तो दाखवल्यास मी ओळखू शकेन. त्यास **मटेरियल ऑब्जेक्ट–१** (**MO-1**) देण्यात येते. आरोपी आज न्यायालयात हजर आहेत.

०३. पोलीसांनी आठ दिवसांनी घटनास्थळ पंचनामा केला. घटनास्थळ मी पोलीसांना दाखवले होते. पोलीसांनी पंचनामा करताना रॉड जप्त केला होता.

**सरतपास पूर्ण**.

<u>**उलटतपास आरोपींकरीता वकील श्री. बी.जी. पाटील यांचेमार्फत**</u> :

०४. सुजाता सुर्वे ही माझी पत्नी आहे. हे म्हणणे खरे आहे की, सन २०२३ पासून माझ्यात व पत्नीमध्ये संशयावरुन वाद आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनेच्या वेळी मुरुड येथील एक महिलेला आणून तिथे राहात होतो. हे म्हणणे खरे नाही की, माझी पत्नी त्यामुळे माझ्यावर संशय घेत होती.

०५. मला कामासंदर्भात फोन आला होता, कोणाचा फोन आला होता हे मी आता सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला मुरुडच्या बाईचा फोन आला होता त्यामुळे माझ्यात व माझ्या पत्नीमध्ये वाद झाले होते. घटनेच्या वेळी मी, माझी पत्नी व दोन मुली हजर होत्या. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या वेळी मी माझ्या पत्नीला मारहाण करत होतो. माझ्या मुलीने सागर व रोहीत यांना फोन केला होता. फोन केल्यानंतर दोघेही आरोपी एकाच वेळेला आले होते. मला हे माहीत नाही की, दोघेही आरोपी एकाच गाडीवर आले होते की नाही.

०६. रॉड माझ्या घरीच होते. दोन्ही आरोपी आले त्यावेळी मी माझ्या घरीच होतो. गॅरेजचे सामान घराच्या बाहेर असते. तथाकथीत घटना घरात घडली होती. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथीत घटनेच्या वेळी मी व माझी पत्नी एकमेकांना मारत होतो. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पत्नीने मला ढकलल्यामुळे मी भिंतीवर जावून आदळलो व मला जखमा झाल्या होत्या. माझ्या पत्नीने मला मारल्यामुळे मी माझ्या पत्नीच्या विरुद्ध तक्रार दिलेली नाही.

०७. आरोपींनी मला लोखंडी रॉडने भरपूर फटके मारले होते. मला रक्त आले होते. साक्षीदार सांगतो की, १२ टाके पडले होते. माझ्या हातावरुन रक्त आले होते. माझा हात फ्रॅक्चर झाला होता, पायाला मुका मार लागला होता. पोलीसांना फिर्याद देताना मी बहीणीला फोन करुन बोलावले होते हे सांगितले होते. सदर बाब माझ्या जबाबात नमूद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. मला ५ ते १० मिनिटे चक्कर आली होती. आई व मामा येण्यापूर्वी मला चक्कर आली होती.

०८. पोलीसांनी मला हॉस्पीटलमध्ये जाण्यासाठी यादी दिली होती. मला पोलीस कोण होते हे आता सांगता येणार नाही. पोलीसांनी त्यावेळी माहिती घेतली नव्हती. हॉस्पीटलमधील पोलीसांनी माझा जबाब नोंदवला होता. माझा जबाब संगणकावर घेतला होता. पोलीस जबाब घेण्यासाठी वॉर्डरुममध्ये आले होते.

०९. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी माझ्या घरी येवून मला मारहाण केली होती हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे व माझ्या पत्नीचे भांडण झाले होते व त्यामध्ये मला मार लागला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींविरुद्ध खोटी फिर्याद दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की,

आरोपींनी मला रॉडने मारहाण केली व मला जखमा झाल्या, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा सरतपास दिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **१६/०९/२०२५**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

**R.C.No. 121/2024**
Exh. **22/C**

Deposition of Witness No. **02** for the State

I do hereby on solemn affirmation state that :-

| | | |
|---|---|---|
| My Name | : | **Dr. Suraksha Nandkumar Mhatre** |
| Age about | : | 26 Years, Occupation : Medical Officer, Civil Hospital, Alibag |
| Residence | : | Civil Hospital, Alibag |

**Examination-in-Chief by A.P.P. Shri. P. S. Patil** :

01. I am qualified as M.B.B.S. I am posted as Medical Officer in Civil Hospital, Alibag since January-2024.

02. The patient Sujit Sunil Surve, had come to the hospital on 10/04/2024 at about 09:50 a.m. along with Harishchandra Hadkar, his uncle with alleged history of assault by two people near Gondhalpada on 10/04/2024 at around 09:00 a.m. The patient was reported to the casualty on 10/04/2024 on 09:50 a.m. On that day, I examined him and found following injuries :

1. Abrasion over left arm size 0.5x4cm.
2. Blunt trauma over left temporal region
3. Abrasion below left eye size 0.1x 0.2 cm.
4. Fracture on shaft of left ulna
5. Bruise linear over left arm size 3x4 cm, 1x4 cm, 1x3cm, 1x1 cm.
6. Abrasion over left forearm size 0.1x1cm
7. Abrasion over right forearm 1x1cm
8. Bruise over lower back size 1x15cm

03. All the injuries were caused by hard and blunt object. All the injuries were fresh. The fracture injury i.e injury No. 1 as per injury certificate is grievous in nature. Other injuries were simple in nature. The patient was examined, his wound was cleared. I stabilize the patient. Thereafter I shifted the patient to X-ray. Today I have brought X-ray report along with me. Thereafter the patient was referred for orthopedist opinion. The police had demanded injury certificate. Accordingly, I issued injury certificate. The injury certificate now showed to me is the same. Its contents are true and correct and it bears my signature. It is marked as **P-3** i.e. **Exh. 23**. The injuries mentioned above are possible by material object-1 two iron rods shown to me.

04. I have given the opinion that the injured was having fracture injury on the basis of X-ray report given by our department. I am having xerox copy of X-ray report along with me.

**Examination-in-Chief over**.

**<u>Cross-Examination for accused by Adv. Shri. B.G. Patil</u>** :

05. It is true to say that injury No. 2 to 8 are simple injuries. It is not true to say that the injuries are possible due to fall. It is true to say that one injury is on the right side of the body and all other injuries are on the left side of the body. The injuries within six hours are described as fresh injuries. It is true to say that within six hours of the examination the injury might have sustained.

06. Injury No. 1 is fracture therefore its size is not

mentioned. Injury No. 2 is a blunt trauma therefore the blunt trauma does not have size hence its size is not mentioned. It is true to say that the patient was not having injury on his legs. It is true to say that the history is mentioned as per the say of the patient. It is true to say that I have not mentioned the time of examination of the patient in the injury certificate. The patient did not come with the police yadi. In this case it is not possible if the person is pushed by the force on wall such type of injuries are possible. It is not true to say that I have issued false injury certificate on the say of patient.

Cross-examination Over.

No Re-examination

R. O. & A. C.

( **M. B. Attar** )
Chief Judicial Magistrate,
Raigad-Alibag

Alibag.
Dt. **06/11/2025.**

:: **CERTIFICATE** ::

Taken before me and signed by me in the presence of accused to whom the deposition is explained in vernacular and full opportunity to cross-examine the witness, is given.

( **M. B. Attar** )
Chief Judicial Magistrate,
Raigad-Alibag

Alibag.
Dt. **06/11/2025.**

नियमीत फौजदारी खटला क्र. **१२१/२०२४**
निशाणी क्र. **२४/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०३** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **हरिश्चंद्र वामन हडकर** |
| वय सुमारे | : | ५३ वर्षे, व्यवसाय : नोकरी |
| निवासस्थान | : | मु. मुशेत, पो. मापगांव, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी.एस्. पाटील यांचेमार्फत</u>** :

०१. दि. १०/०४/२०२४ रोजी घडना घडली होती. सुजित सुर्वे याला त्याचे मेहुणे रोहीत पवार व सागर पवार यांनी लोखडी रॉडने मारहाण केली होती. मला अर्ध्या तासात मामा लवकर या, मला हे ठार मारतील असा सुजित याने फोन केला होता. फोन आल्यानंतर मी लगेच तेथे पोहोचलो. मी ज्या वेळेला तेथे गेलो त्यावेळी तेथे दोन्ही आरोपी हजर नव्हते. सुजित याने त्याच्या आई व बहीणीला फोन करुन बोलावले होते. त्यानंतर मी त्याला सिव्हील हॉस्पीटल, अलिबाग येथे घेवून गेलो होतो.

०२. दि. २२/०४/२०२४ रोजी पोलीसांनी सुजित सुर्वे ज्या घरात राहात होता त्या घराचा पंचनामा केला होता. अमोल भिसे, गोंधळपाडा यांच्या घरात तो राहात होता त्या घरात पंचनामा करण्यात आला होता. घटनास्थळ सुजित सुर्वे याने दाखवले होते. पोलीसांनी त्या ठिकाणचा पंचनामा केला. पोलीसांनी घटनास्थळावरुन एक स्टील व एक लोखंडी असे दोन रॉड जप्त केले होते. आता मला दाखवण्यात आलेले दोन रॉड मटेरियअल ऑब्जेक्ट–१ तेच आहेत. त्यावरील लेबलवर अनु. क्र. १ वर माझी सही आहे. पंचनामा मला दाखवल्यास मी ओळखू शकेन. आता

मला दाखवण्यात आलेला घटनास्थळ पंचनामा तोच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर अनु. क्र. १ वर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र. पी–४** म्हणजेच **निशाणी क्र. २५** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपींकरीता वकील श्री. बी.जी. पाटील यांचेमार्फत</u>** :

०३. मी सेक्युरिटी एजन्सीमध्ये ब्रॅच मॅनेजर आहे. माझे ऑफीस वडखळ येथे आहे. मला रविवारी सुट्टी असते. सुजित हा माझा भाचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सुजितकडे येत जात असतो. मी सुजित याच्या घरात कधीच गेलो नव्हतो. मला सुजितचा जो नंबर माझ्या मोबाईलमध्ये सेव्ह केला आहे त्या क्रमांकावरुन फोन कॉल आला. मला ८:३० ते ९:०० वाजताच्या दरम्यान फोन आला. हे म्हणणे खरे नाही की, मी मारहाणीचा प्रकार प्रत्यक्ष पाहिला नाही.

०४. मटेरियल ऑब्जेक्ट–१ रॉडवर रक्ताचे डाग नव्हते. मटेरियल ऑब्जेक्ट–१ रॉड हॉलमध्ये होते. हे म्हणणे खरे आहे की, पडवीमध्ये गाड्या दुरुस्तीकरीता लागणाऱ्या वस्तू पडलेल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, मटेरियल ऑब्जेक्ट–१ रॉड हे गाड्या दुरुस्तीकरता व गाड्या खोलण्याकरीता वापरले जातात. पंचनामा माझ्या समोरच लिहीला होता. पोलीसांनी रॉड पडवीतून काढले किंवा हॉलमधून काढले हे मला माहीत नाही, मी उशीरा पोहोचलो. हे म्हणणे खरे नाही की, मी जाण्याआधीच पंचनामा सुरु करण्यात आला होता. मी गेलो त्यावेळी रॉड पोलीसांच्या हातात होते. हे म्हणणे खरे आहे की, मी जाण्याआधी पोलीस तेथे हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, दि. २२/०४/२०२४ रोजी मी पंचनाम्यासाठी गेलो हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दि. २२/०४/२०२४

रोजी सुजितच्या सांगण्यावरुन पंचनाम्यावर पोलीस ठाण्यात सही केली. हे म्हणणे खरे नाही की, मी सुजितच्या सांगण्यावरुन आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग.
दिनांक : **०६/११/२०२५**.

( **एम्. बी. अत्तार** )
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.